# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक : ०८/०६/२०२३

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ २०२ /२०२३-२४

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १) संघवी टॉवर सी आणि डी विंग को.ऑ.हौ.सो.लि यांचे दि.१४/०३/२०२३ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | पिंपळ | २० ते २५ फुट | ०२ | १० वर्षे | सदरची झाडे संघवी टॉवर सी -डी विंग को. ऑ.हौ.सो. लि, हटकेश इस्टेट समोर,मिरा भाईदर रोड मिरारोड (पु) येथिल सोसायटीच्या आवारात असून पिंपळाच्या झाडांची मुळे ही पंपरुम मध्ये गेली आहेत त्यामुळे पंपरुम कमजोर झाला आहे तसेच आकेशिया हे झाड पंपरुम च्या बाजुला असून पंपरुमला धोका आहे. दोन्ही झाडे धोकादायक असून मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | आकेशिया | १० ते १५ फुट | ०१ | १० वर्षे | |
| २) श्रीपती II कानुंगो को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि. १९/०४/२०२३ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | सप्तपर्णी | ३० ते ३५ फुट | ०१ | १५ वर्षे | सदरची झाडे श्रीपती II कानुंगो को.ऑ.हौ.सो.लि.,रॉयल कॉम्पलेक्स, ऑलंपिया टॉवर च्या मागे,मिरारोड (पु) येथिल सोसायटीच्या आवारात असून कंपाऊट वॉलवर टेकून झुकलेल्या अवस्थेत आहेत तरी झाडे जोराच्या वाऱ्याने पडून जिवित व वित्हानी होण्याची शक्यता नाकरता येत नाही. या कारणास्तव झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | कदंबा | २० ते ३० फुट | ०१ | १० वर्षे | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(सही)

**(योगेश गुणिजन)**
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

2023-2024. Sadar -Permission